# सायबर सुरक्षा बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**महान ।** जि. प. उर्दु केंद्रीय शाळा, महान येथे नुकतीच सायबर सुरक्षे बाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सानिका वाघमारे, व अदिती जनोरकार या सायबर वॉरियर्स नी ऑनलाईन फसवणूक, वाढता सोशियल मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी,नवनवीन मोबाईल मध्ये येणारे ऐप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाईट्स कशा ओळखाव्या या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा क्विक हिल फाऊनडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबु आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष, शाहीद सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.